क्रमांक .१६६६/१५
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय
धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा मजला
८३, डॉ. अॅनी बेझंट रोड
वरळी, मुंबई ४०० ०१८

# परिपत्रक क्र. ४१५

दिनांक : ३१/०३/२०१५

पहा,

माननीय धर्मादाय आयुक्त यांचे परिपत्रक क्र. ३२३ दि. १९/१०/२००६. 04 APR 2015

विषय : या कार्यालयातील न्याय शाखेचे कामकाज करणेबाबत असलेल्या परिपत्रक क्र.३२३ दि.१९/१०/२००६ मधील काही सुधारणा करुन देण्यात येणारे नविन निर्देश .

1. नविन न्यासाची अथवा संस्थेची नोंदणी करतेवेळी घ्यावयाची दक्षता.
अ) कोणत्याही अवादादित न्यासाची अथवा संस्थेची नोंदणी ही ९० दिवसाच्या कालावधीत होणे आवश्यक आहे. संस्था नोंद झाल्यानंतर १९५० अन्वयेची नोंदणी ही लिखीत ९० दिवसाच्या कालावधीत होणे अपेक्षित आहे.

2. सदर नोंदणीच्या वेळी अर्जदाराने ओळखपत्र या संज्ञेखाली दाखल केलेले कोणतेही एक शासकीय ओळखपत्र ग्राहय मानन्यात यावे.उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड, सिनिअर सिटीझन कार्ड , वाहन चालक परवाना, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र आणि पारपत्र . एखादे ठराविक ओळखपत्र मागण्याची बळजबरी अर्जदारावर करण्यात येवू नये. संस्था नोंदणीसाठी देण्यात आलेल्या ओळखपत्रांच्या प्रति पुन्हा 1950 च्या नोंदणीसाठी घेण्याची आवश्यकता नाही.

3. या कार्यालयात दाखल झालेल्या फेरफार अर्जा सोबत आपल्या कार्यालयातीलअभिलेख्याच्या प्रमाणित प्रति दाखल केला नसल्यास कार्यालयातील अभिलेखा मागवून घ्यावी जेणेकरुन फेरफार अर्जाचा निर्णय होण्यास विलंब होणार नाही. न्यासाने काही कारणस्तव अथवा अनावधानाने नोंदणी पासुन बदल अर्ज दाखल केलेले नसतील तर अशा प्रकरणी अर्जदाराकडून त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे व आता सादर केलेल्या अर्जावर योग्य ती कार्यवाही करावी.

4. प्रत्येक महिन्यात बदल अर्जाबाबत कार्यालयीन कामकाजात एकुण कामकाजाच्या 70% वाद नसलेले फेरफार अर्ज निकाली काढणे आवश्यक आहे . तसेच एकाच संस्थेचे विविध फेरफार अर्ज एकाच वेळी एकाच निकाल पत्राद्वारे निकाली काढण्यात येऊ शकतील परंतु संबंधित फेरफार अर्जातील तथ्य अनुक्रमाने आदेशात नमुद करणे आवश्यक आहे. तसेच फेरफार अर्जात जर आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली असल्यास व फेरफार अर्ज पूर्णपणे भरुन सक्षम अधिका-याकडे साक्षांकित केला असल्यास अर्जदाराकडून पुन्हा शपथ पत्राची मागणी करण्यात येउ नये. फेरफार अर्ज दाखल करण्यास विलंब झाला असेल तर त्या करिता स्वतंत्रपणे विलंब अर्ज दाखल करणे आवश्यक आहे मात्र सदरच्या किरकोळ अर्जास स्वतंत्र क्रमांक न देता तो अर्ज त्या प्रकरणातील एक भाग आहे असे समजण्यात यावे. फेरफार अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अर्जदाराकडून रु.50/ एवढी रक्कम आदेशाची प्रत अर्जदाराला पाठविण्यासाठी सार्वजनिक न्यास प्रशासन निधीत भरणा करुन घेता येईल . ज्यांनी ही रक्कम भरली आहे त्यांना आदेशाची प्रत पोष्टाने तात्काळ पाठविण्यात यावी.

5. जर एखादया संस्थेचे अनुसूची एक फाटलेल्या अवस्थेत असेल अथवा गहाळ झाले असेल तर सदर अनुसूची १ पुर्नलिखित करुन घेण्याची जबाबदारी ही संबंधित अधिका-याची असेल. फेरफार अर्ज निकाली काढणेकरिता अनुसुची १ नाही ही सबब संबंधित पक्षकाराना सांगणे उचित होणार नाही. अनुसूची १ चे पुर्नलेखन करतांना त्यासाठी पक्षकाराने अर्ज करण्याची आवश्यकता नसून संबंधित

अधिका-याने स्वयंखुद्द त्यांचे अखत्यारित असलेल्या न्यासाची अनुसूची १ पुर्नलिखित करुन घेणे योग्य होईल. प्रत्येक अधिका-याने आपल्या अखत्यारित असलेल्या न्यासांचे बदल अर्ज आदेश झाल्यानंतर 90 दिवसांत अनुसूची १ मध्ये नोंदविले आहेत की नाही हे पाहणे आवश्यक राहील. तसेच ही बाब प्रशंसनीय देखील असेल.

6. वादादित प्रकरणे देखील या कार्यालयात ब-याच कालावधीत प्रलंबित असल्याचे आढळून येत आहे. सदर प्रकरणे लवकरात लवकर व वारंवार बोर्डावर घेवून त्याचे गुणवत्तेनुसार निकाली काढणे अतिशय आवश्यक आहे .

7. प्रत्येक सहायक धर्मादाय आयुक्त / धर्मादाय उप आयुक्त यांनी सोबत जोडलेल्या विवरण पत्राच्या नमुन्यात मासिक विवरणपत्र भरुन ते संबंधित विभागीय धर्मादाय सह आयुक्त यांचे कडे पाठविणे अतिशय आवश्यक आहे व संबंधीत मा. धर्मादाय सहआयुक्तांनी त्याची तपासणी करुन बदल अर्ज व वादातीत प्रकरणे प्रमाणात निकाली काढली गेली आहेत का याची तपासणी करावी व तसा शेरा नोंदवून मग या कार्यालयात ती विवरणपत्रे पाठवावी. वेळोवेळी संबंधीत सह आयुक्तांनी मार्गदर्शन करावे.

8. तसेच कार्यालयांची पाहणी करताना असेही आढळून आले आहे कि, या कार्यालयात आलेल्या अभ्यांगतांना ब-याच वेळा विनाकारण तिष्ठत बसावे लागते. या कार्यालयात येणारे अभ्यंगत हे समाजातील जबाबदार नागरिक असल्याने त्यांच्या वेळेचा अपव्यय होणार नाही याची दक्षता अधिकारी व कर्मचारी यांनी घ्यावी.

9. वादादीत प्रकरणामध्ये कोर्टापुढे नोंदविलल्या साक्षी पुराव्याची प्रत पक्षकाराने मागितल्यास योग्य ते शुल्क भरुन घेऊन तात्काळ सदर प्रत लघुलेखकाने त्यांचे अधिका-यांचे संमतीने पक्षकारास दयावी.

10. या कार्यालयात येणारे पक्षकार हे साधारणत: विश्वस्त असल्याने त्यांना योग्य ते सहकार्य मिळणे तसेच प्रत्येक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयातील प्रकरणे विनाविलंब निकाली होवून त्याचा निपटारा होणे आवश्यक आहे त्याकरिता सदर प्रकरणांचा निपटारा विनाविलंब होण्याच्या भुमिकेतून अधिका-यांनी व कर्मचा-यांनी कायदयातील तरतुदींचा योग्य तो उपयोग करावा.

11. तसेच या परिपत्रकाद्वारे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना असेही सुचीत करण्यात येते कि, कोणत्याही प्रकरणात कार्यालयाने पक्षकारांना नोटीस काढून सुनावणीसाठी बोलविलेले असताना सदरची नोटीस रजिस्टर पोस्टाद्वारे पाठविण्यात येत असते. जर सदरची नोटीस लिफाफा किंवा त्याची पोच पावती परत आलेली नसल्यास अथवा भारतीय डाक खाते यांचे संकेतस्थळावर पडताळणी करुन नोटीसची बजावणी झाल्याबाबतची शहानिशा करावी . जनरल क्लॉजेस ॲक्ट क. २७ मधील तरतुदींचा आधार घेवून नोटीस बजावणी झाल्याचे विशीष्ट परिस्थितीत गृहीत धरता येइल.

धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई